महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT AUTHORITY

म्हाडा MHADA

## अभिन्यास मंजूरी व बांधकाम परवानगी कक्ष /नियोजन प्राधिकरण / पंतप्रधान आवास योजना ,म्हाडा.

जा.क्र.अ.मं.व बां.प.कक्ष/PMAY/578/२०२२

दि.19/10/२०२२

प्रति,

मे.ॲड. जयप्रकाश बाविसकर

पोस्ट बॉक्स नं.८,प्लॉट नं.४, टेलेफोननगर,

भागीरथ शाळेच्या मागे,जळगांव

**विषय -** प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये AHP (PPP) अंतर्गत प्रस्तावित गट नं.३६/२/अ,मौजे बोदवड,ता.बोदवड,जि.जळगाव वरील अत्यल्प उत्पन्न गट योजनेकरीता अभिन्यास मंजूरीबाबत प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत प्रस्तावित अभिन्यासास मंजूरीबाबत.

**संदर्भ -** मे. यु.बी. ऑर्किटेक्ट्सयांचा दि.२२/०७/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

महोदय,

सदर पत्रान्वये प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये AHP (PPP) अंतर्गत प्रस्तावित गट नं.३६/२/अ,मौजे बोदवड, ता. बोदवड,जि.जळगाव वरील अत्यल्प उत्पन्न गट योजनेकरीता प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत प्रस्तावित अभिन्यासास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

### अटी व शर्ती

१. अर्जदार यांनी रेरा अधिनियमातील (Maharashtra Real Estate Reguatory ACT-२०१६) तरतूदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

२. प्रस्तावित अभिन्यासात भूखंडाचा वापर अभिन्यासात दर्शवलेल्या वापराप्रमाणे करणे बंधनकारक राहील.

३. नियोजित बांधकामपासून पुढील, मागील व बाजूची अंतरे प्रत्यक्ष जागेवर मंजूरीप्रमाणे वि.नि.नि. मधील तरतुदीनुसार ठेवण्यात यावीत. सदर अभिन्यासात डि पी रस्ता व अंतर्गत रस्ता स्वखर्चाने इमारत बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रापुर्वी संबंधीत विभागाकडुन मंजुर करुन घेणे व भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्यापुर्वी रस्ता पुर्ण करुन घेणे अर्जदारास बंधनकारक राहील. तसेच संबंधीत विभागाकडुन रस्त्याचे काम पुर्ण न झाल्यास अर्जदाराने/विकासकाने/जमिन मालकाने सदर रस्ता स्वखर्चाने पुर्णकरणे बंधनकारक राहील.

४. प्रस्तावित योजनेमध्येखालीलप्रमाणे रहीवासी इमारती प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

तक्ता ३

| अ.क्र. | तपशिल | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १ | भूखंडाचे क्षेत्रफळ ७/१२ उतारा प्रमाणे | १८६००.०० चौ.मी. |
| २ | मोजणी नकाशाप्रमाणे भुखंडाचे क्षेत्रफळ | १८६००.०० चौ.मी. |
| ३ | जागेवरील सद्य परिस्थितीनुसार उपलब्ध अभिन्यासात आकडेमोडकरीता ग्राह्य धरण्यात आलेले क्षेत्रफळ | १८६००.०० चौ.मी. |
| ४ | रस्ता रुंदीकरणाने बाधित क्षेत्र | ०.०० चौ.मी. |
| ५ | उर्वरीत क्षेत्रफळ (३-४) | १८६००.०० चौ.मी. |
| ६ | a) आवश्यक५% सुविधा भुखंड क्षेत्रफळ | ०.०० चौ.मी. |
| | b) प्रस्तावित सुविधा भुखंड क्षेत्रफळ | ०.०० चौ.मी. |
| ७ | a) आवश्यक १०% करमणुकीचे मैदान क्षेत्रफळ | १८६०.०० चौ.मी. |
| | b) प्रस्तावित करमणुकीचे मैदान क्षेत्रफळ | १९६०.८३ चौ.मी. |
| ८ | रहिवासी वापराकरीता निव्वळ भुखंड क्षेत्रफळ | १८६००.०० चौ.मी. |
| ९ | च.क्षे.नि. करीता ग्राह्य धरण्यात येणारे एकुण क्षेत्रफळ | १८६००.०० चौ.मी. |
| १० | अनुज्ञेय च.क्षे.नि. (हरित क्षेत्रकरीता) | १.०० |
| ११ | अनुज्ञेय बांधकाम क्षेत्रफळ | १८६००.०० चौ.मी. |
| १२ | ६०% Ancillary use ६०% | ११९६०.०० चौ.मी. |
| १३ | एकूणअनुज्ञेय बांधकाम क्षेत्रफळ | २९७६०.०० चौ.मी. |

टिप - सदर प्रस्तावात UDCPR विनियम ६.१.१ मधीलतरतुदहनुसार अधिमुल्य भरणा करणे आवश्यक राहील.

५. सदर भूखंडामध्ये १०% खुलेक्षेत्र १९६०.८३ चौ.मी. स्वतंत्र पोहोच मार्गासह अभिन्यासातील रहिवाशांना कायम स्वरुपी खुले ठेवणे बंधनकारक राहिल.तसेच UDCPR विनियम ३.४.२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे विकासक/जमिन मालकाने शपथपत्र (Undertaking) सादर करणे आवश्यक राहील.

६. नगर विकास विभागाने शासन निर्णय क्र. क्र.TPS/१८ १८/CR-२३६/१८ Sec. ३७(१AA)/ UP-१३ नुसार दि. ०२/१२/२०२० नियमावली नुसार पायाभूत सुविधांची तरतूद व प्रतिज्ञापत्रातील इतर अटी शर्तीचे पालन अर्जदाराने करणे आवश्यक आहे व ती पुरेशी करण्याबाबत संबंधित अर्जदाराकडून रु.५००/- चे स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे. त्यानुसार जमिनधारक/विकासक यांनी सोयी सुविधा विकसित करणे आवश्यक आहे.

७. अभिन्यासातील भूखंडात बांधकाम करताना बांधकाम किंवा विकास संबंधित नियोजन प्राधिकरण यांचेकडून प्रचलित इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे संबंधित नियोजन प्राधिकरणाची पूर्व परवानगी घेणेतसेच विहीत विकास शुल्क भरणे बंधनकारक राहील.

८. सदर अभिन्यासात अस्तित्वातील झाडे असल्यास Local Authority कडून Tree NOC घेणे व त्यातील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील. तसेचसदर अभिन्यासात रस्त्याच्या दुतर्फा व तट बंदीला जास्तीत जास्त झाडे लावण्यात यावे.

९. संदर्भित जागेचेक्षेत्र, स्थान, आकार, वापर वहिवाट, भोगवटादार, भाडेकरु मालकी हक्काबाबत काही तक्रारी असल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदार यांचेवर राहील. तसेच लगतच्या भूखंडधारकांच्या काही तक्रारी असल्यास त्याची जबाबदारी अर्जदारावर बंधनकारक राहील.

१०. विषयांकित जमिनीवरील सर्व अंतर्गत रस्तेहे पक्क्या स्वरुपाचे डांबरीकृत करणे व रस्त्या शेजारी विद्युत दिव्यांचे खांब लावणे आवश्यक आहेतसेच रस्त्यालगतची गटारे व इतर गटारे पक्क्या

स्वरुपाचे (सिमेंट विटांचे) बांधून पाण्याचा प्रवाह बाधित होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच जमिनीच्या हद्दीवर सिमेंट विटांच्या स्वरुपात संरक्षण भिंत बांधावी व अंतर्गत रस्त्यास विद्युत दिवे लावण्यात यावेत. तसेच विकास आराखडया अंतर्गतचे रस्ते व सुविधा अभिन्यासात कायम ठेवणे बंधनकारक राहील.

११. प्रस्तावासोबत अर्जदार यांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे या कार्यालयाने अभिप्राय दिलेले आहेत. अर्जदाराने सदर प्रकरणी प्रस्तावासोबत सादर केलेली कागदपत्रे अथवा माहिती चुकीची किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास तसेच, विधी ग्राहयता नसलेले कागदपत्रे आढळून आल्यास सदरची शिफारस रद्द समजली जाईल व अर्जदार कायदेशीर कार्यवाहीसाठी पात्र असेल.

१२. विषयांकित जागा किंवा तिचा भाग भूसंपादन अधिनियम १८९४ किंवा महाराष्ट्र औद्योगिक अधिनियम १९६६ या खालील भूसंपादनासाठी अधिसूचीत केलेली नाही याबाबतची खात्री महसुल विभागाने तसेच अर्जदार यांनी करणे आवश्यक राहील.

१३. विषयांधीन जागेवरील बांधकामाचे मंजूर नकाशाप्रमाणे कार्यान्वय, बांधकाम साहित्याची गुणवत्ता व दर्जा, प्रस्तावित इमारतीचे आर.सी.सी. डिझाईन, अग्निशमन व्यवस्था इत्यादीबाबत जमिन मालक/ विकासकर्ता/ वास्तुविशारद/सल्लागार अभियंता/ स्ट्रक्चरल अभियंता यांची जबाबदारी राहील.

१४. विषयांकित अभिन्यासात जागेवरील बांधकाम करताना आय.एस.१३९२०-१९९३ भूकंपरोधक आर.सी.सी. डिझाईन नुसार बांधकाम घटाकाचे नियोजन अर्हताप्राप्त नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचेकडून घेणे आवश्यक असून त्यांचे देखरेखीखाली नियोजित इमारतीचे बांधकाम पूर्णकरणे अर्जदार/ विकासकर्ता यांचेवर बंधनकारक राहील.

१५. सहरहू प्रस्तावास मंजूरी देणेपूर्वी नियोजित बांधकामामुळे/ विकासनामुळे/ भूखंडावर असलेल्या कोणत्याही वाहिवाटाचे व हक्कांचा भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदार/ जमिन मालक यांची राहील. विषयाधिन जागेच्या हद्दीबाबत काही तक्रारी असल्यास त्याची सर्व जबाबदारी अर्जदारांवर राहील. तसेचसदर मिळकती बाबत न्यायालयीन प्रकरण असल्यास त्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.

१६. अभिन्यासास मंजूरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे असल्यास किंवा वापर बदलावयाचा असल्यास पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे व सुधारीत अभिन्यास पूनश्च: मंजूर करुन घेणे बंधनकारक राहील.

१७. सदर अभिन्यासातील इमारतींना पुढील बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यापुर्वी आवश्यकतेनुसार पर्यावरण मंत्रालयाच्या जारी अधिसुचनेनुसार Environmental Clearance बाबत व अग्निशमन दलाचे (CFO NOC) आवश्यकतेनुसार ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहिल.

१८. सदर अभिन्यासास प्रस्तावित डि पी रस्ता व अंतर्गत रस्ता इमारत बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रापूर्वी संबंधीत विभागाकडून मंजूर करुन घेणे व भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्यापूर्वी रस्ता पूर्ण करुन घेणे अर्जदारास बंधनकारक राहिल किंवा सदर रस्ता विकासकाने स्वखर्चाने पुर्ण करणे आवश्यक राहिल.

१९. सदर अभिन्यासातील इमारतीच्या बांधकाम नकाशांना मंजूरी पूर्वी कामगार उपकर व Development Charges भरणा कार्यकारी अभियंता / बांधकाम परवानगी कक्ष/ पी.एम.ए. वाय यांच्या मार्फतकरणे अर्जदारास बंधनकारक राहील.

२०. सदर प्रकल्पाकरीता सादर केलेले Association of Persons व Power of Attorney पुढील बांधकाम प्रमाणपत्र जारी करणेपुर्वी नोंदणीकृत करुन घेणे आवश्यक आहे.

२१. UDCPR विनियम ३.६ मधील अटीनुसार Electric Substation करीता जागा ठेवणे आवश्यक आहे.

२२. UDCPR विनियम १३.२ नुसार सदरहू इमारतीवर सोलर वॉटर हिटींग सिस्टम बसविणे आवश्यक राहील व त्यामधील तरतुदी बंधनकारक राहिल.

२३.UDCPR विनियम १३.३ नुसार अवश्यकता असल्यास सदरहू इमारतीवर रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम कार्यान्वित करणे आवश्यक राहील.

२४. UDCPR विनियम १३.४ मधील तरतुदीनुसार १ हेक्टर पेक्षा मोठया क्षेत्राच्या अभिन्यासामध्ये आवश्यक १०% R.G. क्षेत्रा व्यतिरिक्त Gray Water Heatmet and Recycling Plant करीता स्वतंत्र भुखंडाची तरतुद करणे आवश्यक राहील.

२५. UDCPR विनियम १३.४ मधील तरतुदीनुसार solid waste management ची तरतुद करणे आवश्यक राहील.

२६. सदर अभिन्यासात प्रस्तावित भुखंडाच्या ७/१२ उतारावर बोजा असल्यास तो पुढील बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र (Further CC) पुर्वी निरंक करुन घेणे आवश्यक राहिल व सदर बाबतीत विकासक/अर्जदाराने प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

२७. MOEF पर्यावरण विभागाच्या अधिसुचनेनुसार २०००० चौ.मी. बांधकाम क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्राकरीता राज्य शासनाकडुन ना हरकत प्रमाणपत्र बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र जारी करणेपुर्वी घेणे आवश्यक आहे.

२८. सदर अभिन्यासात इमारतीची उंची ७.७५ मी. प्रस्तावित असुन त्याबाबत आवश्यकतेनुसार भारतीय विमानतळ प्राधिकरण (नागरी विमान सेवा) Civil Aviation यांचे इमारतीच्या उंचीबाबत आवश्यकता असल्यास ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे बांधकाम परवानगी जारी करणेपुर्वी आवश्यक राहील.

२९. CSMC व SLSMC मधील अटी व शर्ती लागु राहतील.

३०.सदर प्रकल्प उच्चदाब विद्युत वाहिनीने बाधित होत असल्यास त्यासंबंधित नियमांचे पालन करणे अर्जदारास बंधनकारक राहिल.

३१.सदर रेखांकनाचा आदेश उपलब्ध झालेल्या कागदपत्रांच्या आधारे देण्यात आलेला आहे.त्या कागदपत्रांतील कोणतीही माहिती खोटी अथवा दिशा भूल करणारी असल्याचे निदर्शनास आल्यास तसेच भुखंडाबाबत न्यायालयीन प्रकरण असल्यास सदर आदेशाचे पुर्नविलोकन करण्याचे /रद्द करण्याचे अधिकार नियोजन प्राधिकरण/ (PMAY) म्हाडाला असतील.

आपला विश्वासू

(रुपेश तोटेवार)
कार्यकारी अभियंता
अभिन्यास व बांधकाम परवानगी कक्ष
पीएमएवाय कक्ष /प्रा.

प्रत - अभिन्यासाच्या प्रतीसह पुढील कार्यवाहीस्तव सादर.
१) कार्यकारी अभियंता, अभिन्यास व बांधकाम परवानगी कक्ष/ पीएमएवाय कक्ष /प्रा.
२) कार्यकारी अभियंता, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
३) ऑर्किटेक श्री.उज्जवल भोळे (यु.बी.आर्किटेक्टस)

प्रत - माहितीस्तव सविनय सादर.
१) मा.मुख्य अधिकारी, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
२) मा.आयुक्त, जळगांव महानगरपालिका, जळगांव -४२५००१
३) सहाय्यक नगररचना संचालक, नगर रचना व मूल्य निधारर्ण विभाग,जळगाव

| STAMP OF DATE OF RECEIPT OF PLANS | STAMP OF DATE OF APPROVAL OF PLANS |
|---|---|
| Approved Subject to Conditions Mentioned in this office letter no. PMAY/A/MHADA.578 Layout Approval & BP /19/10/2022 | 19 OCT 2022 |
| JAA/PMAY | Ex. Engg./PMAY |

Layout Approval Cell / PMAY / A / MHADA







## PROFORMA A

| | DISCRIPTION | AREA IN SQ.MT |
|---|---|---|
| 1 | Area of Plot | 18600.00 |
| | (a) As per ownership document (7/12, CTS extract) | 18600.00 |
| | (b) as per measurement sheet | 18600.00 |
| | (c) as per site/as per demarcation by arch | 18600.00 |
| 2 | Deductions for | |
| | (a) Proposed D.P./D.P. Road widening Area/Service Road/Highway widening | 0.00 |
| | (b) Any D.P. Reservation area | 0.00 |
| | (c) Encrochment area | 0.00 |
| | (Total a+b+c) | 0.00 |
| 3 | Balance area of plot (1-2) | 18600.00 |
| 4 | Amenity Space (if applicable) | |
| | (a) Required Amenity space is not applicable as the plot area is less than 20,000 sq.m | 0.00 |
| | (b) Adjustment of 2(b), if any - | 0.00 |
| | (c) Balance | 0.00 |
| 5 | Net Plot Area (3-4) for FSI purpose | 18600.00 |
| 6 | Recreational Open Space (if applicable) | |
| | (a) Required - ( 18600X10% ) | 1860.00 |
| | (b) Proposed - | 1960.83 |
| 7 | Internal Raod area | - |
| 8 | Permissible FSI for Green Zone | 1.00 |
| 9 | Built up area with reference to Basic F.S.I. as per PMAY since the plot is under green zone (18600 X1.00) | 18600.00 |
| 10 | Addition of FSI on payment of premium | |
| | (a) Maximum permissible premium FSI - based on road width / TOD Zone<br>(b) Proposed FSI on payment of premium | 0.00 |
| 11 | In-situ FSI / TDR loading | 0.00 |
| | (a)In-situ area against D.P. road *[1.0 x Sr. No. 2(a)], if any* | 0.00 |
| | (b)Insitu area against Amenity Space if handed over [2.0 or1.85 x Sr. No. 4 (b)and / or(c)], | 0.00 |
| | (c) TDR area | 0.00 |
| | (d) Total in-situ / TDR loading proposed (11 (a)+(b)+(c)) | 0.00 |
| 12 | Additional FSI area under Chapter No.7 | 0.00 |
| 13 | Total entitlement of FSI in the proposal | 18600.00 |
| | (9 + 10) | 0.00 |
| 14 | Ancillary Area FSI upto 60% with payment of charges. | 11160.00 |
| 15 | Total entitlement BUA (9+13) | 29760.00 |

## CERTIFICATE OF AREA:

Certified that i have surveyed the plot bearing gat no - 36/2/A of of Village Bodwad Tal. bodwad , Dist. Jalgaon. stated on the plan are as measured on site and the area so worked out is 18600.00 sq.m and tallies with the area stated in the document of ownership / town planning scheme records.

SIGNATURE OF ARCHITECT

## OWNER's DECLARATION:

I / We undersigned hereby confirm that I/We would abide by plans approved by Authority/Collector I /We would execute the structute as per approved plans.also I/we would execute the work under supervision of proper technical person so as to ensure the quality and saftey at he work.

## PROFORMA 'B'

CONTENTS OF SHEET

LAYOUT PLAN
LOCATION PLAN

DESCRIPTION OF PROPOSAL & PROPERTY

PROPOSED LAYOUT OF EWS & LIG SCHEME ON PLOT BEARING
GAT NO 36/2/A OF OF VILLAGE BODWAD
TAL. BODWAD , DIST. JALGAON

NAME OF DEVELOPER

ADV. JAIPRAKASH BAVISKAR.
GPA HOLDER FOR SATISH PUNDALIKRAO BAVISKAR

| JOB NO. | | | |
|---|---|---|---|
| DRAWN BY | SHRIDHAR M | DATE | 18.08.2022 |
| CHECKED BY | DEEPAK A | SCALE | AS SHOWN |
| NORTH | NAME, ADDRESS AND SIGN OF ARCHITECT | | |


ubarchitects
602 - B, Sarvoday 11, Kher Nagar, Bandra (East), Mumbai- 400051.
www.ubarchitects.in
UJWAL SATISH BHOLE


Digitally signed by UJWAL SATISH BHOLE
Date: 2022.10.11 17:03:21 +05'30'

